## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )
www.prabhutarun.com

: संपादिका :
सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :
मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया

## प्रभु तरुण आश्रयदाते

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

वर्ष ८६ वे) प्रभुतरुण मुंबई, शनिवार, ता. १६ माहे एप्रिल, सन २०११ (अंक ९८१

*संपादकीय*

## चांदण्यांची उधळमाधळ?

-सुहासिनी कीर्तिकर

परवा परवा महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या दुरंगी लढतीच्या निवडणुका पार पडल्या. नेहमीप्रमाणे ‘चिरंतन’ आणि ‘साहित्योपासक’ मध्ये चुरस होती. डॉ. माधवी वैद्य कार्याध्यक्ष आणि प्रा. मिलिंद जोशी प्रमुख कार्यवाह म्हणूंन निवडून आले. दोघेही माझ्या जवळच्या मित्रवर्तुळातले. साहित्याची जाण असणारे, संयोजन-नियोजनातले दर्दी, संस्थेबद्दल अपार प्रेम असणारेआणि मुख्य म्हणजे त्यासाठी स्वत:चा वेळ देऊ शकणारे. आनंद वाटला मला. गंमत म्हणजे हाच मिलिंद जोशी साहित्य परिषदेच्या बाहेर असताना परिषदेविरुद्ध हाकाटी करण्यात अग्रेसर होता. तेव्हाचे कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांच्याविरुद्ध परिषदेतील हुकूमशाही-बद्दल त्याने ‘अंतर्नाद’मधून लेखही लिहिला होता. नंतर एकदा परिषदेतच त्याची जोगळेकरांशी गाठ पडली. जोगळेकरांनी त्याला चहा पाजला अन् म्हणाले, ‘बाहेर राहून बोलणे, लिहिणे सोपे असते.परिषदेविषयी खरंच काही आतून वाटत असेल तर आत या. कामं करा. अडचणी समजून घ्या. मग खुशाल बोला. लिहा मनाप्रमाणे.’ मिलिंद यावर ‘आत’ गेला. जोगळेकरांचा पुढे उजवा हातही झाला. बोलताना तेव्हा मला म्हणाला, ‘बाई, खरंच बाहेर राहून टीका करणं सोप्पं असतं. संस्था प्रामाणिकपणे चालवायची तर चोख काम करणाऱ्याला टीका सहन करावी लागते. आत्ता कळतंय, जोगळेकरसर असा असा निर्णय का घेत होते!’ मिलिंदची ही प्रतिक्रिया अन् त्याचा अनुभव प्रत्येक संस्थेतील सर्वांचेच प्रतिनिधीत्व करणारा नाही का?

नाहीतरी टीका करणे हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क असतो. त्यातले ‘ओ का ठो’ कळत असो; नसो! सध्या क्रिकेटचा ज्वर सर्वांनाच चढतोय. घरीदारी, रस्त्यावर, ट्रेनमध्ये-सगळीकडे त्यावरच जोरदार चर्चा. अर्धी चर्चा टीकाखोरीच करणारी. ‘त्याने झेल सोडला, काढून टाकला पाहिजे त्याला. ह्याने धाव घेतली नाही, काय बॅट म्हणजे झाडू फिरवतो की काय? अमक्यानें फिक्सिंग केलं असणार बहुधा. तमका म्हणजे काय; अंपायरचा ‘चेंडू’च!’ प्रत्येकजण ‘टीका’ उगारून आपला बोलतोय. अरे, आत शिरून खेळून बघा. बॅट तरी पेलवेल का तुम्हाला? मग ‘फूटवर्क’च्या गोष्टी करा ना. पण नाही. टीका करणाऱ्याचं तोंड कोण धरणार? विशेषत: ज्ञातीय, प्रांतीय, राष्ट्रीय संस्था म्हणजे कागदोपत्री आपल्याच ना? मग हक्कच आहे टीका करण्याचा. म्हणूनच जो उठतो तो मनमोहन सिंगांपासून पृथ्वीराज चव्हाणांपर्यंत शब्द कोरडे होईपर्यत ठणाणा करतो. नागरिक म्हणून हक्कच आहे ना? ‘युजीसी’पासून कुलगुरूंच्या धोरणाबद्दल वैचारिक आव आणून ओसंडून बोलतो. कारण उघड आहे. आयुष्यात एकदा कधीतरी ‘डिग्री’ घेऊन शिक्षणव्यवस्थेचे ‘डिग्रीमापन’ त्याने अनुभवलेले असते. पण त्यापलीकडे जाऊन जागतिक पातळीवर शिक्षणमूल्य वाढवायचा सरकार प्रयत्न करते आहे, शैक्षणिक धोरण आखते आहे, याबद्दल काही माहिती

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Indian Summer

-Vaijayanti Kirtikar

Summer…the most prominent season in the Indian calendar. What comes to your mind when you think of summer? Blistering heat, sweat running down your brow, uff the unwanted tan? Or do you mentally make a checklist of all the cool things that are on the horizon of this hot season? The cuckoo song, warm and luscious mangoes, cool thirst quenchers, summer dresses, beautiful hats, longer days, cold showers, youngsters totally free from exam tension and many more desirable things?

Just like the other seasons, summer too has its pros and cons. But why think of the cons, when everyday you have to cross so many hurdles regardless of which season it is. The best way to enjoy this season is to start enjoying the frills attached with it. To start with, make a list of all the fun things you would like to do this summer, visit hill station getaways, get creative and make your own cool drinks, throw parties under the evening sky, get the cool haircut you always wanted, get tattooed, learn to play the guitar à la Bryan Adams in the song ‘Summer of 69’, gear up for Pratyush or simply switch on the AC and curl under your sheet with your favourite paperback. The next step would be to start actually living the things on your summer list. Voila, you will be enjoying summer much to your neighbour’s envy who must be wondering why you so love the sweat under your collar. Of course there are other simpler ways to arouse the curiosity of your neighbor, the easiest would be to keep smiling like a Cheshire cat and leave your neigbour wondering which mouse you have just gulped.

Luckily for us the biggest cricket season is here too. Now who on earth is going to feel the heat when you are busy cheering for your favourite players. So this interesting game takes almost 3 months burden of bearing the heat off our shoulders. That leaves us with just a few days here and there in between. I am sure with so many ideas floating in your head, it wouldn’t take much time to make the summery pulp and enjoy it as well.

I just finished reading Harper Lee’s old classic "To Kill a Mocking Bird". The book describes the journey of growing up through the innocent mind of a little girl Jean Louise and her much silly summer exploits with her sibling and friend. It is strange that as time passes, even the gravest of situations we have faced appear silly to us later. Just like Jean Louise, maybe this summer is the time to reminisce those past summers when some silly things were warded off by you as grave dangers. Share them with your co-participants or partners in crime and have a hearty laugh at it. Better idea would be to start writing your autobiography, you never know if the prophecy of the 2012 disaster does come true, your diary might be the only survivor after the end of the world, and maybe when history is being rewritten in a new world, your diary will be found and will be regarded as the holy manuscript.

Now if my ideas are getting weirder with every line, probably the "Mumbai" heat is getting to

(पान २ कॉलम २ वर)

पान१ कॉलम २ वरून

असो वा नसो; उचलली जीभ लावली टाळ्याला. शाळेतले 'ॲक्टीविटी' शिबीर असले की पालक म्हणून हे टीका करायला 'ॲक्टीव्ह'! अशी बाहेर राहून टीका करावीशी का वाटते आपल्याला?

याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे त्या त्या यंत्रणेविषयी, संस्थेविषयी खरोखरची आपुलकी, आस्था मनात असते. आपण त्याचा एक घटक आहोत ही प्रामाणिक भावना असते. म्हणून त्या त्या संस्थेचे भले झालेच पाहिजे असा प्रामाणिक विचार असतो त्यामागे. दुसरे कारण म्हणजे 'निरुद्योगी मन'. आत शिरून स्वत:ला काहीच करायचे नसते. सभांना हजर राहायचे नसते, कायदेनियम समजून घ्यायचे नसतात, मैदानात उतरून खेळायचे नसते, जे धुरा वाहत आहेत त्यांनाही समजून घ्यायचे नसते आणि आपल्यालाही विचार करता येतो- करणाऱ्यावर वचक ठेवता येतो असेही वाटत असते. पण हे वाटणे निष्क्रीय असल्याने ते हवेत नुसतीच बॅट फिरवल्यासारखे ठरते. ना चेंडू टोलवला जात; ना करणारी माणसे 'आऊट' होत. या दुसऱ्या कारणामुळे टीकाकारापेक्षा आपल्यातला टीकाखोर अधिक प्रभावी होत असतो. मग तो सतत कशा ना कशावर, त्याच त्याच मुद्द्यावर टीका करत राहतो.

कधीतरी विनोबा भावेंनी सांगितलेली गोष्ट मी या आधीच सांगितलेली असेल. मोह आवरत नाही म्हणून तिची परत उजळणी. देवाने ही सृष्टी घडवतांना कसब पणाला लावून एकेक दिव्य निर्मिती केली. पण त्याआधी त्याने 'टीकाकार' निर्माण केला. (म्हणजे पहा, विनोबांनाही माणसापासून टीकाकार वेगळा काढावा वाटला!) प्रत्येक निर्मितीवेळी टीकाकार नाक मुरडी. नावं ठेवी. याला काय शेपूट आणि कान दोन्ही लांब. याचे डोळेच पिचपिचे. हा काय; तर अगडबंब. हा काय तर मुठीत मावेल एवढा इवलासा. याचा रंगच असा. त्याचा आकारच तसा-' वगैरे वगैरे. देव वैतागला आणि सारे कसब पणाला लावून त्याने 'माणूस' निर्माण केला. त्याला वाटले आता टीकाकार खूष होणार. पण कसचं काय; नि फाटक्यात पाय! टीकाकारबुवा मान डोलवीत उत्तरले, 'हां. इतरांपेक्षा देवा निश्चितच चांगली आहे ही निर्मिती. पण एक चुकलंच.' 'आता काय?' हा पुढं म्हणाला. 'अरे देवा, माणसाच्या मनाला एक खिडकी का नाही केलीस? त्याच्या मनातलं कळलं असतं ना?' देवाने हात जोडले. म्हणाला, 'माझं चुकलंच. मी टीकाकारच निर्माण करायला नको होता.'

जिथे देवाचंच चुकलं तिथे विविध संस्थांमधील खरेखुरे कार्यकर्ते, धुरीण, जबाबदार अधिकारी, खेळगडी काय करणार? 'निंदकाचं घर' शेजारी आहे असं म्हणून सोडून द्यायचं झालं! कवी गोविंदाग्रजांनी कवितेतही त्यांच्यातला 'बाळकराम' जीवंत ठेवला होता- अशा त्यांच्या एका विनोदी कवितेत त्यांनी टीकाकाराची खिल्ली उडविली आहे. त्या कवितेतला टीकाकार देवालाच जाब विचारतो आहे. आकाश चांदण्यांनी खच्चून भरलेले असताना चांदण्या रात्रीची मजा लुटायची सोडून कवितेतला टीकाकार म्हणतो, 'काय ही चांदण्यांची उधळमाधळ! आकाशात एवढा मोठा चंद्र असताना इतक्या चांदण्या लुकलुकून काय उजेड पाडणार? इतकीच हौस होती तर एखादी पुरली असती ना? देवाला बचत करणं काही जमत नाही बुवा!' ही 'उधळमाधळ' ऐकून (वाचून) मनापुढे 'तारे' चमकले नाहीत तरच नवल!

-इति 'टीका'पुराण संप्रुण समाप्त.

●

(पान१ कॉलम ४ वरून)

me. Guess I need to actually put all my ideas into action. I am going to start with the autobiography idea, anything for some promise of probable fame. Now that I have mentioned Mumbai, I just had an argument with a friend when I happened to mention Bombay instead of Mumbai during our conversation. Well, I am proud to be a Mumbaikar, and it was just a slip of the tongue when Bombay peeped through, but when I was subjected to an adverse reaction, likening my slippery tongue to Kasab's gun, I had to remind my dear friend that the fact is that I was born in Bombay and I have spent 15 years of growing up in Bombay, so many summers and so many of all the other seasons spent in Bombay and no one can take that away from me. In my memory, Bombay was a much better place to live in than today's Mumbai, the childhood summers were much more fun than those now. Summers then were not about the blistering sun, only about vacations and mangoes. But everyone is entitled to his opinion.

Ah summer summer!! 40 °C has made me dedicate this entire piece of writing to the Mumbai summer of 2011.

**P.S:** A Passing Thought – *"The most important thing in life is your family. There are days you love them, and others you don't. But, in the end, they're the people you always come home to. Sometimes it's the family you're born into and sometimes it's the one you make for yourself."*

(What's this got to do with summer? Even I'm trying to figure it out, but the heat is not allowing me to be rationale, naa forget it, I better get back to writing my autobiography)

●

# भूतकाळातील 'प्रकाशातील परभू'

## चित्रकार महर्षी कै. श्री. शामराव रामचंद्र जयकर



**कै. श्री. शामराव रामचंद्र जयकर (१८६५-१९३८)**

श्री भगवान साईबाबांच्या शिर्डीत द्वारकामाईत श्रीधुनीसमोरच असलेल्या श्रीसाईनाथांच्या चितारलेल्या नयनमनोहर अप्रतिम चित्रांचे चित्रकार आहेत कै. शामराव रामचंद्र जयकर. श्री जयकर यांनी काढलेले हे चित्र चित्रकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून प्रसिद्ध आहे. धुनीची धग लागून सदरचे छायाचित्र खराब होऊ लागल्याने साई संस्थानने ते मूळ चित्र संस्थानच्या दीक्षित वाड्याजवळील संग्रहालयात जतन करून ठेवले आहे. श्रीसाईबाबा खरेखुरे कसे काय दिसत असत याची कल्पना या चित्रावरून स्पष्ट येते.

कै. शामराव रामचंद्र जयकर यांचा जन्म १८६५ साली झाला. त्यांचे जन्मस्थान मुंबई. शामरावांचे आजोबा विनायक हरी शंकर जयकर तत्कालीन ब्रिटीश राजवटीत एक प्रथितयश कायदेपंडित होते. शामरावांचे वडील रामचंद्र त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी वारले व शामराव आई, धाकटे तीन बंधू व एक बहीण यांच्यासह त्यांचे मामा बाबासाहेब अजिंक्य (भाऊ रसूलचे नातू) यांच्या घरी आले. शामरावांचा शिक्षणक्रम तत्कालीन मिशन स्कूलमध्ये झाला. मिशन ट्रेनिंगमुळे त्यांचे इंग्रजीचे ज्ञानही वरच्या दर्जाचे होते. लहानपणापासून त्यांना चित्रकलेचा विलक्षण नाद व त्यावेळी त्यांनी कुणाचेही उत्तेजन नसतानासुद्धा आपला व्यासंग चालूच ठेवला. त्यांचे मामा बाबासाहेब अजिंक्य हे चार गावे मालाड, अकुर्ला, भाईंदर इत्यादींचे खोत व पोर्ट ट्रस्टच्या अर्ध्या धक्क्याचे मालक होते. पोर्ट ट्रस्टच्या धक्क्याला अजूनही 'भाऊचा धक्का' म्हणून सर्व ओळखतात. स्वभावाने बाबासाहेब अतिशय कडक. ते अक्कलकोट स्वामींचे निस्सीम भक्त होते.

वयाची विशी गाठल्यावर तरुण शामरावांनी आपल्या मामांचे-बाबासाहेबांचे घर सोडले. ते स्वभावाने फार भाविक होते. स्वतंत्रपणे वावरू लागल्यावर त्यांना त्यावेळी भाटिया ज्ञातीत एक महाराज होते, त्यांच्याकडे चित्रकार म्हणून पाऊणशे रुपयांची नोकरी मिळाली.

शामरावांची चित्रकलेतील प्रगती त्यांचे पणजोबा घारोजी यांनी लक्षात घेतली. घारोजींना गुजराती समाजात बरीच मानमान्यता होती. शामरावांना घेऊन घारोजी लक्ष्मीदास खिमजी नावाच्या एका मान्यवराकडे गेले. घारोजींनी आपला हा पणतू चित्रकार आहे, अशी ओळख करून दिली. लक्ष्मीदासांनी शामरावांना राजकोटला पाठवून दिले. श्री. तख्तसिंग नावाचे राजकोटचे तत्कालीन अधिपती होते. त्यांचेकडे शामराव गेले. सोबत लल्लुभाई सामळादास इत्यादींची शिफारस पत्रे त्यांच्याबरोबर होती. राजकोटला शामरावांना तख्तसिंग यांनी खूप काम दिले व सर प्रभाशंकर पट्टणी हे युवराज भाऊसिंगजी यांचे शिक्षक होते, त्यांच्याकडे शामरावांची जेवण्या-खाण्याची-राहण्याची सोय केली. तिथे दिलेले काम शामरावांनी अगदी हुबेहूब पूर्ण केलेले पाहून बघावयास आलेले सर्वचजण खूष झाले. यापूर्वी काठेवाडात बरेच युरोपियन चित्रकार येऊन पैसे कमावून गेले होते. पण एका भारतीय चित्रकाराचे कौशल्य पाहून शामरावांचा तिथे बराच बोलबाला झाला.. तख्तसिंग हे एक गुणज्ञ व उदार अंत:करणाचे राजे होते. ते त्यांचे काम पाहून इतके खूष झाले की, काय वाटेल ते माग, म्हणून त्यांनी त्यांना सांगितले. शामरावांनी सांगितले असते तर दरबारातील मानकऱ्याची जागा सहज त्यांना मिळाली असती. पण मी परत येईन तेव्हा आपणास भेटेन, असे सांगून कामाचा मोबदला मिळाल्यावर शामराव मुंबईस परतले. पुन्हा ते जेव्हा राजकोटला गेले, तेव्हा तख्तसिंगांची राजवट बदलून भाऊसिंगांची राजवट सुरू झाली होती व प्रभाशंकर पट्टणी दिवाण झाले होते. पण हे दोघे हिशेबी होते. तेव्हा शामरावांना तिथे भरपूर काम मिळाले खरे, पण प्राप्तीचे प्रमाण त्यामानाने कमीच होते. म्हणून ते पुन्हा मुंबईस आले.

पुढे दैवयोगाने शामरावांना अक्कलकोटच्या राणीसाहेबांचे काम मिळाले. पुढे शामरावांनी मुंबई-पुणे येथे काही वर्षे काढली. १९०६ साली खानबहादूर खंबाता म्हणून पुणे लष्करात एक वजनदार पारशी गृहस्थ होते, त्यांच्या आग्रहावरून १९१६ पर्यंत त्यांनी तिथे वास्तव्य केले. लष्करात रुस्तमजी घड्याळी म्हणून त्यावेळी एक दागदागिन्याची पेढी होती.

(पान ५ कॉलम ३वर)




# ‘हस दे तू!’

## अवलिया मेहमूद

मेहमूदची अनेक गाणी आहेत. त्यातल्या काही गाण्यांची ओळख करून घेऊ या. मेहमूद एक अवलिया होता. प्रत्येक चित्रपटात तो वेगवेगळ्या भूमिकेतून आपल्यासमोर आला. त्याच्या अदाकारीने आपल्याला मनमुराद हसवलं. बऱ्याचशा चित्रपटातून त्याने हैद्राबादी ढंगाची पात्रं रंगवून चांगलाच रंग भरला.

‘गुमनाम’ चित्रपटातील त्याच्या गाण्याने एक नवा उच्चांक गाठला. एका विमानाला काही अपरिहार्य कारणामुळे एका निर्जन बेटावर उतरावं लागतं. निर्जन बेट, घनदाट जंगल, पुरानी हवेली असं सगळं रहस्यमय वातावरण असते. सर्व प्रवासी- बेबी नंदा, हेलन, प्राण, मनोजकुमार असे अनेक त्या हवेलीत वास्तव्याला असतात. मेहमूद त्या हवेलीचा खानसामा असतो. एका प्रवाशाचा खून होतो. वातावरण तंग होते. मेहमूदच्या गाण्याने मनावरचा भार थोडा हलका होतो.

हे एक स्वप्नगीत आहे. उंचावरून येणाऱ्या पायऱ्या, उंच खांब, पुतळे, वाऱ्याने हलणारे पडदे, कारंजे आणि धुरांचे लोट अशा स्वप्नमय वातावरणात मेहमूदची हाक ऐकू येते...

खयालो में....खयालो में....

हेलन पायातले घुंगरू वाजवत एका जागेवरून दुसरीकडे पळताना दिसते.

है हंगामा, कहाँ भाग रही है तुम<br>
कालेसे डर गयी क्या.

एवढं म्हणून तो हेलनजवळ येतो. ढोलकीच्या तालावर दोघे नाचू लागतात.

हम काले है तो क्या हुआ दिलवाले है<br>
हम तेरे तेरे तेरे चाहनेवाले है<br>
हम काले होतो क्या हुआ दिलवाले है<br>
ये गोरे गालाँ तन्दाना<br>
ये रेशमी बालाँ तन्दाना<br>
ये सोला सालाँ तन्दाना<br>
हम तेरे तेरे तेरे चाहनेवाले है

मेहमूदचा अवतार बघण्यासारखा असतो. वर्णाने काळा. मोठाले काजळ घातलेले डोळे. अंगात चटेरीपटेरी लुंगी. तसाच एक टी शर्ट. केशरचना अशी की जणुकाही डोक्यात काळी टोपी घातली असावी. कपाळावर आलेले एका रेषेत कापलेले केस. ओठावर हिटलर छाप मिशा. मध्येच दोन्ही हातात लुंगी धरून नाचणं. ढोलकीचा ठसकेदार ठेका. हेलनची दिलखेचक अदाकारी, सगळंच गंमतीदार आहे. नेहमीचा ठेका बदलून रॉक अँड रोल संगीत सुरू होतं. हेलन मेहमूद त्या तालावर नाचतात. संगीत शिगेला पोहोचतं आणि थांबतं. नंतर मेहमूद भरतनाट्यमचे बोल बोलतो. त्याच्या बोलावर हेलन भरतनाट्य पेश करते.

हम माना गरीब है तन्दाना<br>
सुरतसे अजीब है तन्दाना<br>
पर फिरभी नसीब है तन्दाना<br>
के तेरे करीब है तन्दाना<br>
हम तेरे तेरे तेरे......

‘हम काले हो तो क्या हुआ दिलवाले है’ मेहमूदचा तृतीयपंथी अविर्भाव, आवाज (टाळ्यांचा कडकडाट, हंशा) मेहमूद बेभान होऊन नाचत असतो. हेलन लांब पळते.

क्या टांग हिला रही क्या<br>
हिला कर रख दुंगा<br>
अल्लाह मेरी मदत करो अल्लाह<br>
मै पोट्टीको छोडुंगा नही<br>
अल्लाह...अल्लाह...अल्लाह...अल्लाह...

जेव्हा भानावर येतो तेव्हा स्वयंपाकघरात बसलेला असतो. सभोवती कांदे, बटाटे, टोमॅटो पसरलेले असतात. डोक्यावर पीठाचा डबा सांडलेला असतो.

चित्रपटःगुमनाम १९६५<br>
संगीतः शंकर-जयकिशन<br>
गीतः शैलेंद्र<br>
गायकः महंमद रफी / मेहमूद<br>
कलाकारः मेहमूद, हेलन

‘दो फूल’ या चित्रपटात चुट्टन आणि पुट्टन या दोघा भावांची कथा आहे. विनोद मेहरा (चुट्टन) आणि मेहमूद (पुट्टन) हे दोघे शहरात राहणारे. घरात भांडून ते दोघे घराबाहेर पडतात. मेहमूदचा डबलरोल आहे. एक पुट्टन आणि दुसरा मणी. मणी हा गावात राहणारा. त्याची एक प्रेयसी. मणीचं प्रणयाराधन. केरळच्या बॅकवॉटरच्या पार्श्वभूमीवर गाणं सुरू होते. रमाप्रभा आणि मेहमूद.

आशा भोसले (रमाप्रभा)- मुत्तुकोडी किवाहडी अडा<br>
मुत्तुकोडी किवाहडी अडा<br>
मेहमूद- अय्योडा! प्यार मे जो ना करना चाहा वोही मुझे करना पडा

मेहमूद येथे वेगळ्याच ढंगात पाहायला मिळतो. लांब केस, केसांचा बुचडा बांधून केस मागे सोडलेले. अंगात धोती कुडता (चटेरीपटेरी ती लुंगी.सफेद धोती) खांद्यावर उपरणं. रमाप्रभा साऊथची नटी. तिचा खास मल्याळी युवतीचा पेहराव. म्हणजे अंगात चोळी आणि कमरेला पदर गुंडाळलेली साडी.

मूळ तामिळ चित्रपट ‘अनुभवी राजा अनुभवी’ मधील गाणं टी. एम. सुंदरराजन आणि एल. आर. ईश्वरी यांनी गायलं आहे. तामिळ शब्द ‘मुथु कुलिक्का वरीगला’ असे आहेत. अर्थ असा आहे की, ‘माझ्यावर खरं प्रेम असेल तर सागराच्या तळाशी जाऊन शिंपल्यातील मोती (मुत्तु) काढून मला भेट आणून दे. प्रियकर म्हणतो, अय्योडा! (नाही, जमणार नाही) प्रेमासाठी काय काय करावं लागणार कोण जाणे.

मेहमूद या चित्रपटाचा निर्माता होता. पंचमदा संगीत देत होते. हे गाणे किशोरकुमार गाणार होता. पण तालमीच्यावेळी मेहमूद हे गाणं गुणगुणायचा. तेव्हा पंचमदांनी किशोरकुमारऐवजी मेहमूदची निवड केली. मूळ तामिळ गाणं थोडंसं सरळ आणि संथ जातं. पण आशाजींनी यात खटकेबाज जान आणली आहे.

चित्रपटः दो फूल १९७३<br>
संगीतः आर. डी. बर्मन<br>
गीतः मजरूह सुलतानपुरी<br>
गायकः आशा भोसले, मेहमूद<br>
कलाकारः मेहमूद, रमाप्रभा

### घन घन माला नभी दाटल्या

गीतः ग. दि. माडगूळकर<br>
संगीतः वसंत पवार<br>
स्वरः मन्ना डे<br>
चित्रपटः वरदक्षिणा (१९६२)

या चित्रपटात माई भिडे, रमेश देव, सीमा देव, राजा गोसावी, दामुअण्णा मालवणकर, जोग, सुवर्णा सेंजित अशा उत्तम आणि जाणकार कलाकारांनी कामे केली आहेत. शांताराम (रमेश देव) एक सुस्वभावी तरुण, आपटे (साळवी) यांच्या जागेत भाडेकरू म्हणून राहत असतो. अत्यंत सालस आणि सर्वांना मदत करण्याचा त्याचा स्वभाव असतो. आपट्यांच्या तीन मुलींपैकी दोन नंबरची मुलगी कृष्णा (सीमा देव) हिच्यासाठी वरसंशोधनाच्या मोहिमेवर असतो. त्यासाठी तो पुणे, मुंबई, हैद्राबाद व शेवटी वसई असा सर्वत्र फिरत असतो. प्रत्यक्षात त्याचं कृष्णावर अव्यक्त प्रेम असतं. शांताराम वरच्या माडीवर राहत असतो. खाली तळमजल्यावर जोग यांचा गायन क्लास असतो. जोगमास्तर मुलींना ‘मल्हार’ रागातील एक पद शिकवित असतात. साथीला पेटी तबला असतो. गाणं सुरू होते-

घन घन माला नभी दाटल्या, कोसळती धारा<br>
केकारव करी मोर काननी, उभवून उंच पिसारा<br>
घन घन माला......<br>
कालिंदीच्या तटी श्रीहरी, तशात घुमवी धुंद बासरी<br>
एक अनामिक सुगंध येतो ओल्या अंधारा<br>
घन घन माला नभी....<br>
कृष्ण विहरिणी कोणी गवळण, तिला अडवते कवाड अंगण<br>
अंगणी अवघ्या तळे साचले, भिडले जल दारा...भिडले जल दारा<br>
घन घन माला....

जोगमास्तरांचे हावभाव विनोदी आहेत. ताना हवेतून खेचून आणतात. तबल्याचा ‘धा.धीं.धिन्ना’चा ठेका, एखाद्या कुस्तीपटूच्या आवेशात मांडीवर थोपटून काढतात. ‘केकारव करी मोर काननी, उभवून उंच पिसारा’ येथे गुडघ्यावर उभे राहून दोन्ही हातांनी पिसारा फुलवतात. शांताराम वर चहा पीत असतो. चहा पिऊन कपबशी विसळायला तो मोरीतील नळ उघडतो. पण नळाला पाणीच नसते. मग तो बालदीतल्या पाण्याने कपबशी धुतो आणि कामावर निघतो. काही वेळाने नळाला पाणी येते आणि नळ उघडाच राहिल्याने पाणी धो धो वाहू लागतं. थोड्याच वेळात मोरी पाण्यानं तुंबते. ‘अंगणी अवघ्या तळे साचले भिडले जल दारा’ शेवटी गाणं टिपेला पोहोचतं. ‘कोसळती धारा- कोसळती धारा’ आणि खरोखरच वरच्या छतातून खाली पाणी कोसळू लागते. सगळा शिष्यवर्ग त्यांच्या गुरुजीसह ‘मेघमल्हार’च्या या अचाट शक्तीने अचंबित होतो.

-नंदकुमार विजयकर<br>
nandusuhas03@gmail.com

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



YUVA MANCH
Together Towards Tomorrow

# TOURISM INDUSTRY IN INDIA

**- Rohan Rane**

*Rohan Rane is the Business Director of Orbitz Corporate & Leisure Travels (I) Pvt . Ltd. He has 18 years of experience in the tourism industry and was previously working as Executive Director with Wanderlust. His core areas of specialization are Business Development, Customer Centric Initiatives, Strategic Market Planning, Inventory Management, Product Development & Innovative Verticals of Business, Human Resource Management, International Liasons & Contracts, etc. He is a member of SKAL International Association of Travel & Tourism Professionals and Maratha Chamber of Commerce & Industries & PCSIA. His achievements include Best Business Model Award in 2006 and Best Revenue Management Award in 2011.*

Tourism industry today in India is at its peak boom. Both Inbound & outbound tourism is increasing at a pace of 40% p.a. An increasing number of Indians are frequently traveling out for Business & Leisure strongly majorly due to the significant rise in the middle income level & also the arrival of low cost airlines & Innovative pricing policies.

There are various sectors in tourism which are blAtional & Domestic Group or Individual Holidays, Inbound tourism, Business Tours, Study Tours. Unique concepts like Medical Tourism, Sports Tourism, Cultural Tourism & Adventure Tourism, are growing on a fantabulous note.

Unique & off beat destinations are picking up, apart from the traditional destinations of Far East, Europe & Dubai. International Destinations like The Meditarean, Egypt, Greece, Scandinavia, South America, Hawaii, New Zealand, Ireland, Japan & China are now in demand.

Realizing the immense potential and future growth of the Tourism & Hospitality sector, major Hotel Chains, Airlines & Cruise companies are dynamically increasing their infrastructure & inventories, through huge investments & massive expansion plans. Major mergers, acquisitions of Travel Companies, Hotel & Airlines are in news.

It is also important that the industry with such a northward growth rate comes in tune with application of technology. To meet the demands of the market, application of technology is the priority agenda of majority of the tour companies. I am happy to say that majority of the Industry players are using world class standards, as far as the use of technology is concerned in all segments of operations.


The online Business Module has further elevated the industry dynamism & growth, with world class operators mushrooming in this segment through massive investments.

The Tourism ministry-Govt.of India, has also initiated several projects & promotional campaigns, through participation at several International tourism Road show & conventions, thus getting India as a destination highlighted on the International Circuit.

ORBITZ Corporate & Leisure Travels (I ) Pvt Ltd introduces a new era in the Travel Industry , by bringing world class services to the Indian traveler across all segments which include Trade Fairs Tours, Conferences ,Study Tours,Exhibitions,Corporate Incentive Tours, Premium Internationl Holidays, Premium Indian Holidays & Individual Travel Services, Operating from a network of 19 offices in India & Offices in Europe & Middle East, housing the most professional team of 350 travel consultants. We are committed to providing superlative services to the traveler by integrating world class travel solutions at the best value. We are powered by the latest & world class technology & constant innovations in our product line.

Students wishing to pursue their careers in tourism have several avenues open for them now, in terms of Tour companies, Airlines, Travel Agencies, with a wide range of choice of segments for specialization. Over the last 04 years there has been a terrific increase in the remuneration packages in the tourism sector, matching to any industry standards. More & more students are selecting Travel & Tourism as their career path, including MBAs.

I would conclude by saying that the tourism industry is driven by passion. You need to be a people's person to be a part of this beautiful industry. Come join the travel boom which is here to stay.




# What's in the Name?

**- Ajit Mankar**

I do not wish to debate this subject being too complex for my brains. However, I am sure all the community members of PP will concur if I say our Surnames are too heavy for pronunciation for people other than PP. Of course, there is no slightest intention on my part to suggest we PP members should not feel proud of our age-old surnames while facing the world at large. On the contrary, I always believe there is a great pride attached to being a member of PP community and the unique surnames we all share.

Our surnames such as Jayakars, Vijayakars, Dhurandhars, Dhairyavans etc. are no doubt, quite intriguing and unfamiliar for outsiders. One Mr.Dharadhar called me one day and in my absence my servant happened to attend the call. He later narrated that someone by the name Catch-catch or Pakada-pakada called earlier. Why go that far? My own surname Mankar is always mis-pronounced phonetically as Manke/Mankus/Mankame etc. I have become quite immune to such mishaps. For convenience sake I shorten my name as Ajit and that of Tejasweeni as Sweeni and this works far well.

During my New Zealand trip early this year, our hosts in Auckland enthusiastically booked our party of two couples, on a fascinating sight-seeing trip of the northern-most tip of the country called Cape-Rianga. It is a long journey from Auckland totalling a drive of over 900 kms. by bus. One is, therefore, required to break the journey at a well-developed tourist town called Pahia which is roughly about mid-way. We were cautioned by our hosts that we must not miss the 2 hour speed-boat sea ride at Pahia, at any cost, which takes the tourists through the Hole in the Rock. We were also warned that there is a tremendous rush for the sailings as the boat capacity is hardly limited to 15 persons per evening.

The moment the bus stopped at Pahia at 10 AM, I jumped off and as a seasoned Mumbaikar, ran like mad, hunting for the booking office for tickets of the boat-ride, beating all other passengers of the bus. The booking office was manned by Gary, a very mischievous, cheerful and talkative young man, an ideal friendly character for the touristic liaison. It took hardly a minute to become friends. The ticket of the boat ride was NZ $ 20/-each. I handed over to Gary a note of NZ $ 100/-for 4 tickets totally costing NZ $ 80/-. For issuing the ticket Gary asked me a tricky question as to what is my name. Now, I knew very well what is in the name in a foreign land? To avoid complications, as per my normal experience,

I simply said "AJIT". Gary was very much pleased with my name. To my surprise, he said he

knows 2 more Ajits whom he had taken on the boat-ride earlier. They were Ajit Wadekar and

Ajit Agarkar who happened to visit Pahia during some festival cricket games and Gary being an

ardent lover of cricket had befriended himself with these 2 Indian cricketing legends. In the end Gary handed me over 4 tickets with residual cash. I promptly rushed back to join our party waiting for me. While checking the tickets and tallying the cash I realized that, inadvertently, while being engaged in small talk, Gary handed me over NZ $ 120/- instead of just $ 20/-he was supposed to do.

I had to rush back to the office once again about half a km away. However by then there was a long orderly queue of the ticket seekers formed in the office. The dilemma was how to rush to Gary to return the excess change, as abroad no one appreciates and tolerates jumping of the queue. To my good luck, Gary noticed me standing in the queue again and signaled me to come to his glass cubical from the back door. I explained the error and returned to Gary a note of NZ $ 100/-

Gary was so thrilled; he thanked me and was all praise for my honesty, and sincerity in taking the trouble of covering some distance to return the excess cash to the Govt. treasury. Besides acknowledging the good deed loudly in public, he quietly asked for my surname. I told Gary not to insist about knowing my surname as the same is quite complex for his tongue and further quoting the proverb" what's in the name?" But Gary was adamantly saying he wanted to by-heart my surname so that he could remember me like Wadekar and Agarkar, for ever. Finally, after a little hesitation, I was compelled to disclose my surname as Mankar. As expected, Gary reproduced my name to sound like Man-Khar !

I wish, God gives me another opportunity to visit New Zealand one more time, of course, not to test Gary if he still remembers my name, but simply to enjoy this beautiful country and its friendly people all over again. Long and short is, after all, who cares for the name? At least as far as I am concerned, I sincerely do not believe "What's in the Name", eh!... What says you?

# वर्तमानकाळातील 'प्रकाशातील परभू'




**Dr. Medha Dhurandhar**

Center for Development of Advanced Computing (CDAC), Pune-411007.

**Position At CDAC:**

- **Director** CDAC School of Advanced Computing, Mauritius
- **Head of Programme Coordinator**: High performance Business Computing Group & Geomatics Solution Development Group, Pune
- **Chief Corporate Coordinator for all centres of CDAC**: IT Ministry's Projects for North East
- **Head of Software Engineering Process Group, CDAC**

**Cross-disciplinary Expertise**: Developed/delivered projects/products in the interdisciplinary areas of Mathematics, Operation Research, Computer Science, Healthcare, Computational Finance deploying Software Engineering Quality systems. Major contribution in developing business intelligence software tools addressing real-world problems through interdisciplinary approach.

**Chief Architect**: Involved in all the phases of software Development Life Cycle of R&D and commercial projects. Conceived and executed multiple projects for different verticals such as Health Care, Financial services, Transport, Telecom. Obtained grants from national government from Indian and overseas markets. Managed large teams and multiple projects simultaneously.

**Areas of Specialization**:

Optimization techniques, Business Intelligence using mathematical modeling, Artificial Intelligence, Design and Development of algorithms, Parallel Processing, Data Mining

**Education**

Ph.D. (Mathematics- Graph Theory and Combinatorial Analysis)- India

**Post doctoral research at Unversity College of Cardiff (UK), TIFR, IISC etc.**

**Member of many international societies**

***International Recognition***:

⇨ Marquis Who's Who (USA) has featured biographical sketch in the following publication:

- Who's Who in World
- Who's Who in Science and Engineering
- Who's Who in Asia

⇨ As an Advisor to WHO (World Health Organization) presented a paper in the international conference ``Public Health Informatics 08'', Sep. 17-19, 2008, Seattle, USA

**Recent Awards**:

- Fedration of Indian Chambers of Commerce & Industry (FICCI) award for ``Excellence in Science, Technology & Technological Innovation'', 2009-10
- ``Gargee Award 2009'' by Sri Ramanujan Mission Trust (Chennai), International Multiversity, and Mahesh Group of Indusries for contribution to society through technology.
- Innovations 2009: Ideas into Practice'' award by Tie Foundation and IIT

**Intellectual Property Rights**:

Several USA and Indiian Patents, Several Copyrights, Several International Publications.

## परीक्षेतील सुयश

**बीएस्सी-बायोकेमिस्ट्री**
**आणि जेनेटिक्स**
**टेक्सास ए अँड एम विद्यापीठ**
नीती अंजन कोठारे

**सीपीए- (युएसए)**
श्री. अंकुर अरविंद राव ८६.५ टक्के
**प्राची मराठी भाषा, तिसरी परीक्षा**
(शिक्षक संघटनेतर्फे आयोजित)
कु. अनुष्का आशिष प्रमोद नवलकर
विशेष गुणवत्ता श्रेणी

(पान २ कॉलम ४ वरून)

घड्याळेही तिथे विक्रीसाठी ठेवली जात. खंबातासाहेबांच्या शिफारसीवरून फॅन्सी पोट्रेटस् ठेवण्याचा क्रमही तिथे सुरू झाला. पुण्यात त्यावेळी पावसाळ्यात गव्हर्नरसाहेबांचा मुक्काम असे, म्हणून बरेच राजेरजवाडे पुण्यात मुक्काम करीत व रुस्तमजी घड्याळींच्या पेढीवरून जातांना आतील तैलचित्रे पाहून पेढीमध्ये प्रवेश करीत व एखादे चित्र खरेदी करीत असत. त्याबरोबर दागदागिने-घड्याळेही घेत. अशा प्रकारे खाजगी कामे, शिकवण्या, दुकानातील चित्रे काढून शामरावांनी ते दिवस काढले.यावेळी शिर्डीत साईबाबा म्हणून एक साक्षात्कारी विभूतीचे वास्तव्य आहे अशी माहिती शामरावांच्या मेव्हण्यांनी (कै. क्रिकेटवीर वामन बापूजी तळपदे) सांगितली. याच दरम्यान शामरावांचे स्नेही व साईबाबांचे भक्त कै. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनी शामरावांना स्वत: शिर्डीस जाऊन श्रीसाईबाबांचे चित्र काढावे म्हणून विनंती केली होती. त्यांना जरूर ती ओळख देऊन मदतही दिली. त्यावेळेपर्यंत श्रीसाईबाबा ते शिळेवर बसलेले असे एकच चित्र उपलब्ध होते. शामराव शिर्डीस गेले व तिथे त्यांनी बाबांच्या भक्तमंडळींची मदत घेऊन बाबांना विनंती करून त्यांचे तैलचित्र काढले. बाबांनीही त्यांची विनंती मान्य केली व बाबांचे तैलचित्र त्यांनी मशिदीत बसून काढले. त्यांनी प्रथम पेन्सिल स्केच काढले व बाबांचा चेहरा प्रथम रंगविला व दीक्षितांच्या वाड्यात बसून बाकीचे काम पूर्ण केले. ते चित्र इतके हुबेहूब होते की, स्वत: बाबांनी त्याची प्रशंसा केली. शामरावांनी या चित्रासारखी आणखीन चार चित्रे काढली. त्याचबरोबर श्रीसाईबाबा सर्व भक्तांसोबत चालले आहेत. त्यांच्या डोक्यावर छत्री धरली आहे. सोबत दोन लहान मुले आहेत. एकाच्या हातात चोपदाराचा चांदीचा दंड आहे तर एकाच्या हातात पूजेचे ताट आहे. हे चित्रही शामराव जयकर यांनी त्याच दरम्यान काढले. त्यामुळे द्वारकामाईतील चित्राचा चेहरा आणि या चित्रातील चेहऱ्यात बरेच साम्य आहे. या चित्रातील ज्या मुलाच्या हातात चोपदाराचा चांदीचा दंड आहे, तो शामराव जयकरांचा सुरेंद्र नावाचा मुलगा आणि दुसरा रावबहादूर मोरेश्वर प्रधानांचा मुलगा.१९१७ साली शामरावांनी एक तैलचित्र स्वत: पूजेसाठी काढले व बाबांच्या हाती दिले. साईबाबांनी हे चित्र 'चावडी उपर लगाव' म्हणून शामरावांना सांगितले. शामरावांना त्याचा अर्थ लागला नाही व त्यांच्या मनाचापण विसर पडला. पुढे साईबाबा १९१८ साली समाधिस्त झाल्यावर १९२५-२६ साली बाबांचे भक्त हरी सीताराम दीक्षित, रा. ब. मोरेश्वर प्रधान इत्यादी मंडळीनी शामरावांकडे ते तैलचित्र बाबांच्या बैठकीच्या जागेत लावण्यासाठी मागितले. तेव्हा शामरावांना फार आनंद झाला. तेव्हा त्यांनी त्या तैलचित्रास व्यवस्थित वॉर्निश करून, काच, फ्रेम करून त्यांच्या स्वाधीन केले. तेच तैलचित्र आज बाबांच्या बैठकीच्या जागी, धुनीसमोर लाखो लाखो भाविकांच्या नेत्रांना साक्षात बाबाच जणू तिथे बसलेले आहेत, म्हणून आनंद देत आहे. या अत्यंत सुंदर चित्रातील जीवंतपणा शब्दात वर्णन करून सांगता येणार नाही.

काही काळ डॉ. पिल्ले यांच्या गैरहजेरीत शामरावांना बाबांची चिलीम भरून देण्याची कामगिरी मिळाली होती.

१९१७ साली पावसाळ्यात शामराव बाबांची परवानगी घेऊन मुंबईस परतले. पुढे त्यांना सांताक्रुझ येथे नरोत्तमदास भानजी या एका श्रीमंत कापडाच्या व्यापाऱ्याकडे त्यांच्या बंगल्यात एक स्वतंत्र खोली मिळून त्यांनी दिलेल्या फोटोप्रमाणे तैलचित्रे काढणे, असे काम मिळाले. १९२२ पर्यंत ते तिथे होते. पण पुढे जागतिक मंदीमुळे त्यांचे ते काम सुटले.

शामराव हे जसे उत्कृष्ट चित्रकार होते, तसे उत्तमपैकी मूर्तीकारही होते. पार्ल्यास असताना पार्ले टिळक विद्यालयासाठी १९२३ साली गणपती उत्सवानिमित्त त्यांनी श्रीगजाननाची उत्तम मूर्ती तयार करून दिली होती. लोकमान्य सेवा संघासाठी त्यांनी मूर्ती तयार करून ती टिळक मंदिरात बसविण्यात आली होती. अंतरकर नावाच्या रामदासस्वामींच्या भक्ताच्या आग्रहानुसार त्यांनी समर्थ रामदास स्वामी गुहेबाहेर उभे आहेत व दुरून श्री शिवाजी महाराज काही मावळ्यांसह त्यांना भेटावयास येत आहेत, असे बहारदार चित्र काढून दिले होते. रेळे नावाचे एक वैद्य पार्ले येथे रहावयास आले असता त्यांनी शामरावांकडून त्यांच्या गुरुंचे एक व श्रीदत्तात्रेयाचे एक, अशी मोठ्या आकारातील चित्रे तयार करवून घेतली होती.

कोणत्याही चित्रावरून सुरुवातीस अत्यंत सात्विक भाव आणून सुंदर चेहरा काढणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. आर्ट स्कूलमध्ये कोणत्याही प्रकारचे शिक्षण न घेता शामरावांनी तैलचित्रकार म्हणून स्वतंत्र आयुष्यक्रम घालविला. १९०३-०४ साली मुंबई वरिष्ठ न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सर लॉरेन्स जैकिन्स यांची पत्नी ही फ्रेंच अकादमीची शिष्या होती. तिची काही प्रसंगाने शामरावांशी गाठ पडून त्यांच्या कामाची तिने मुक्त कंठाने प्रशंसा केली व स्वत: युरोपियन रंगांच्या मिश्रणाची कला शामरावांना शिकवली. १८१४ साली पुण्यात टेनिसन कोल नावाचा एक इंग्रज कलाकार होता. त्यानेही त्यांच्या कामाची प्रशंसा केली व आपलीही कामे शामरावांना दाखविली. रंगाची

(पान ६ कॉलम ३ वर)

## प्रभुतरुणास देणगी

❖ श्रीमती मंजुळा ना. धराधर यांच्या तृतीय स्मृतीदिनानिमित्त त्यांचा नातू श्री. सतेज आंबवणे यांजकडून रु. ५०१/-

❖ श्रीमती उषा गुरुनाथ धैर्यवान यांजकडून त्यांची नात ज्युली अजिंक्य यांनी पीएचडी केल्याप्रीत्यर्थ रु. ५००/-

❖ सौ. सुनीता वि. आनंदकर यांजकडून त्यांची मुलगी सौ. अल्पना प्रशांत चवाथे यांना पुत्र झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ रु. २५१/-

❖ सौ. ऐश्वर्या आणि श्री. आशिष नवलकर यांजकडून कु. अनुष्काच्या परीक्षेतील यशाप्रीत्यर्थ रु. १०१/-

❖ सौ. दर्शना आणि निमिष जयपाल धैर्यवान यांना १९-११-१० रोजी 'इवा' हे कन्या झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ त्यांच्याकडून रु १०१/-

❖ १६-१२-१० रोजी कन्या सौ. अनुषा आणि जावई श्री. श्रीपाद सुनील आगासकर यांना प्रियांश (विवान) हा पुत्र झाल्याबद्दल सौ. नुतन आणि श्री. जयंत बा. कीर्तिकर या आजीआजोबांकडून रु. २५१/-

## अभिनंदन

❖ श्री. शीतल तळपदे यांना प्रकाशयोजनेसाठी (नवा गडी, नवं राज्यला) प्रथम आणि (व्वा गुरूला) तृतीय असे एकदम दोन पुरस्कार बहाल झाले. अभिनंदन.

❖ श्री. राजन मोतीराम जयकर यांनी मुंबई मराठी साहित्य संघातर्फे झालेल्या साहित्य महोत्सवात परभी बोलीची वैशिष्ट्ये सांगणारे विचार मांडले. त्यावेळी त्यांनी खास परभी डगला आणि पगडी परिधान केली होती. अभिनंदन.

❖ Julie Ajinkya completed her B.A. in political Science (magna cum laude honors) from Amnerst College in 2003. In 2008 she did her M.A. in Political Science (with distinction) from cornell University. Soon afterwards, in 2011, she completed her Ph.D. in Political Science, also at cornell University. Her Doctoral dissertation has been nominated as both the `Nation's Best Religion and Politics' dissertation, as well as the `Nation's Best Woman and Politics' dissertation. Decision is pending untill summer 2011

❖ वरळीला नेहरु सेंटरमध्ये दहा दिवस सौ. शोभा शेट्ये (मालती माधवराव देसाई यांची कन्या) यांच्या 'वॉटरकलर पोर्ट्रेटस्'चे सुंदर, चैतन्यमयी प्रदर्शन भरले होते. अनेक नामवंतांनी या प्रदर्शनाला भेट देऊन पसंती दिली. दाद इतकी मिळाली की तिथल्या तिथे अनेक चित्रे विकली गेली. अभिप्रायाची वही भरून गेली. अभिनंदन.

❖ 'इटुकली घंटुली' या डॉ. सुमन नवलकारांच्या पुस्तकाला 'आशीर्वाद पुरस्कार' मिळाला. अभिनंदन.

## प्रतिक्रिया

प्रभुतरूण मार्च २०११ मधील मिनाक्षी जयकर यांचे विस्तारीत संपादकीय मनाला खूप भावलं. जागतिक मराठी दिनाचे औचित्य साधून, तमाम स्वाभिमानी मराठी भाषिकांच्या ह्रदयाची तार छेडल्याबद्दल मिनाक्षी जयकरांचे त्रिवार अभिनंदन. आपण म्हणता की, इतर भाषिकांमध्ये मराठी शिकण्याची लाट आली आहे. पण हे उशीरा सुचलेले शहाणपण आहे. परप्रांतीय महाराष्ट्रात येतात. मुंबईत बस्तान ठोकतात. पण वर्षोनुवर्षे येथे राहून मराठी भाषेशी आणि पर्यायाने मराठी माणसाशी फटकून वागतात. एफ.एम. वाहिनीवाले मराठी गाणी म्हणजे डाऊन मार्केट म्हणून अवहेलना करतात आणि म्हणूनच एखादा 'कौशल' स्वाभिमान गीताची निर्मिती करून असल्या मुजोर वृत्तीविरुद्ध दंड थोपटून उभा राहतो. बेमुर्वतखोर लोकांना समज देण्यासाठी असल्या 'इफेक्ट'ची मात्रा लागू पडते. आपली अस्मिता जपायची असेल तर मराठी भाषकांनी मराठीत बोललं पाहिजे, मराठी वाचलं पाहिजे, मराठी ऐकलं पाहिजे आणि मराठी पाहिलं पाहिजे. कोठल्याही भाषेचा द्वेष नसावा तसंच आपल्या भाषेचा न्यूनगंड नसावा. शेवटी आपण म्हणालात ते खरं आहे. मराठी भाषकांनी आपल्या मातृभाषेवर प्रेम करावे. अमराठी भाषकांनी मराठीवर प्रेम करावे. मराठी माध्यमातून शिकलेल्यांनी मराठीवर प्रेम करावे किंवा इंग्रजी माध्यमवाल्यांनी मराठीवर प्रेम करावे. पुन्हा एकदा आपले अभिनंदन आणि धन्यवाद.

मराठीचा अभिमानी,
**नंदकुमार विजयकर**
nandusuhas03@gmail.com


// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*

*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन,
स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८


**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

७-१-११ सौ. अल्पना प्रशांत चवाथे, (पूर्वाश्रमीची अल्पना वि. आनंदकर) पुत्र

### विवाह माणिक महोत्सव

२१-३-११ सौ. भारती आणि श्री, रसिक कृष्णराव विजयकर

### मरण

२०-३-११ सौ. तृप्ती राजन व्यवहारकर वय ५०, वांद्रे
३-०४-११ श्री. जयराम रामराव कोठारे वय ८४ खार

(पान ५ कॉलम ४ वरून)

बचत करून काम कसे उठावदार होते, हे त्याने शामरावांना सांगितले होते.

तैलचित्राखेरीज शामरावांच्याकडे आणखीन एक जबरदस्त कला होती. ती म्हणजे हस्तीदंतावरील, जलरंगातील व्यक्तीचित्रे, तैलचित्रे काढणारे अनेक नामांकित चित्रकार होऊन गेले. पण जलरंगाने हस्तीदंतावर, आंगठीमध्ये, लॉकेटस्मध्ये राहणारी व काही त्याहून जराशी मोठी वेगवेगळ्या आकाराची, केवळ ठिपक्या ठिपक्यांनी काढलेली पण दुर्बिणीशिवाय ठिपके न दिसणारी अशी चित्रे किंवा ती काढणारे चित्रकार मुंबईत नव्हतेच. त्यावेळी आंगठीत राहणाऱ्या आकारापासून साधारण अडीच ते तीन इंचाचे वेगवेगळ्या आकाराचे २९ नमुने एकत्र करून ते त्यांनी एका फ्रेममध्ये बसविलेले होते व हे सारे काम ७०-८० वर्षांपूर्वी केलेले असून त्यात अद्याप काहीच फरक पडलेला नाही व त्यातील रंगसौंदर्य व व्यक्तीचे साम्य पाहणाऱ्यांची दृष्टी मात्र त्यावर खिळून राहते.

त्यांचा मुलगा श्रीपाद यांच्या हातातही वडिलांच्या हातातील चित्रकला तंतोतंत उतरली. दादरच्या किर्ती कॉलेज ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापकांची नऊ तैलचित्रे त्यांच्याकडून काढून घेतली असून ती सर्व कॉलेजच्या वाचनालयात लावण्यात आलेली आहेत. तसेच मैलापूर मद्रास येथील ऑल इंडिया साई समाजाच्या साई मंदिरात त्यांनी काढलेले साईचे चित्र लावण्यात आलेले आहे. म्हैसूर येथल्या साईमंदिरातही त्यांनी काढलेले साईचित्र लावलेले आहे.

(श्री साईसागर, मार्च २००११ अंकातून साभार)

●

## खाऊगिरी

## Shingdya- With Kheema and Chicken Filling

**–Aishwarya Velkar**

**Ingradients:**

***For the crust***-Maida 250 gm., Ghee 50 gm., Rice flour 50 gm.

***For the Kheenma Filling***- Mince 250 g., Onions 2 medium size, Ginger/Garlic paste 2tbs., Cjilli powder 2 tsp., Tirmeric Poder half tsp., Oil one 7 half tsp., salt to taste, Corrinder- half bunch

***For Chicken Filling***- Half Chicken boiled & shredded, Maida-2 tsp., Butter-1 tsp., Milk-100ml., Grean Chillies-2 cut into pieces, salt to taste.

**Method:**

To make Crust- In a flat plate take the ghee and keep spreading it with the flat of your palm till it changes colour to white. Then add the rice flour and keep spreading till smooth. Take a vessel half filled with water. Make small balls of ghee and drop into the vessel. The balls should float. Now knead maida with water and oil till soft. Keep covered under moist cloth for at leasr 3 hours. Make small balls of maida. Roll one by one like Chapatis, put ghee and spread. Layer 3 chapatis like this. Roll and cut lengthwise into small pieces. Roll out each into an oval shaped with your palm. Put filling, close like a shingdi.

Preheat oven at 200 OC. Bake shingdyas for 20 mins. or till top is slightly pinkish and crusty.

**Kheema Feeling**: Put all ingredients in a vessel. Cover lid with water and cook for 30 mins. The Kheema should be almost dry. Kheema is ready to be filled.

**Chicken filling**:- Take some butter in a pan. Heat and put maida. Saute for some time. Put chillies, salt. Pour milk and keep stirring till it thickens like cusard. Add the shredded chicken, mix and remove from flame. Chicken is ready for filling.

●